# "ती"चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी

मासिकांक: १३

दिनांक: ३० एप्रिल २०२२



संपादक:

सौ. सायली अक्षय देशपांडे

# "ती"चं पान

तिच्याकडून सगळ्यांसाठी

**"ती"चं पान वेबसाईट:**

www.tichapaan.com

**"ती"चं पान ई-मेल:**

tichapaan@gmail.com

**मुखपृष्ठ आणि अंक मांडणी**

**अक्षय देशपांडे**

**"ती"चं पान व्हॉट्सअॅप क्रमांक:**

7378499977

# श्रेय नामावली

| | |
|---|---|
| प्रबंध संचालिका | सायली अक्षय देशपांडे |
| संपादक | सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक व मार्गदर्शिका | सौ. शुभा साठे |
| टीम "ती" चं पान | |

तृष्णा आंबेकर
अपूर्वा भालेराव
रेणुका देशपांडे
दिशा टिकेकर
मृण्मयी सारंग
भार्गवी बाबरेकर
निर्मिती देवलसी
संजीवनी मराठे
स्वर्णिमा प्रकाश
प्राजक्ता बर्वे

# अनुक्रमणिका

टीप: आपणास जो लेख वाचावयाचा आहे, त्या लेखावर कृपया टॅप करा.


| | |
|---|---|
| संपादकीय - सायली अक्षय देशपांडे | ०५ |
| दोन शब्द - आशुतोष अडोणी | ०६ |
| मनी वसंत फुलला - संध्या दुर्गे | ०८ |
| रामायण सत्य की कल्पना ? - मृण्मयी कतर्णी – सांबरे | १७ |
| ऋतुराज वसंत - डॉ. मानसी मोहरील | १९ |
| मनातले सूर आणि...! - भार्गवी बाबरेकर | २५ |
| राम- निर्मिती देवलसी | २७ |
| हृदय मंदिरातील राम - अंजली उपाध्ये | २९ |
| पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा- प्राजक्ता बर्वे | ३२ |
| ऋतुराज- दिशा टिकेकर | ३४ |
| ।।एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम्।। - सायली देशपांडे | ३६ |
| समारोप—सायली देशपांडे | ३८ |

# संपादकीय

सायली अक्षय देशपांडे

आपदामपहर्तारं दातारं सर्वसम्पदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥

सर्वप्रथम ती चं पान च्या सगळ्या रसिक वाचकांना हिंदू नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!

आपलं नवीन वर्ष अर्थातच चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा. या गुढीपाडव्यापासूनच प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्मोत्सवाची सुरुवात. आठ दिवस उत्साहात आनंदात साजरे केल्यावर येते ती रामनवमी. तसं पाहिलं तर ऋतुचक्राप्रमाणे मनाला आल्हाद देणाऱ्या ऋतुराज वसंताचे आगमन हा एक सुंदर सोहळा अवघ्या चराचरात प्रत्येक प्राणिमात्र साजरा करत असतो. हा वसंत जसा प्रत्येकाच्या मनात एक सकारात्मक उमेद निर्माण करतो तसाच हा वसंत आमच्याही ती चं पान साठी भाग्यदायी ठरला. मार्च महिन्यात आमच्या या वर्षभर चालणाऱ्या उपक्रमाचा वार्षिकांक प्रत्यक्ष पद्धतीने प्रकाशित झाला आणि त्या प्रकाशनानंतरचा हा आमचा "वसंत विशेष मासिकांक" प्रकाशित करतांना अत्यंत आनंद होतोय.

या मासिकांकाबद्दल विशेष सांगायचं म्हणजे नव्या उमेदीने आणि आनंदाने हा अंक सजला आहे. चैत्र,वसंत आणि प्रभू श्रीराम या तीन विषयांच्या जवळपास गुंफलेला असा हा अंक आहे. यात लिहीत असलेल्या प्रत्येक लेखिकेने कथा,कविता,गीत रामायण अशा विविधांगी विषयांचा आधार घेत या अंकात लिखाण केले आहे. राम हे फक्त नाम नसून ते एक तत्व आहे याचा प्रत्यय सुद्धा बऱ्याच जणींचे लिखाण वाचतांना येतो.

या अंकाचं सगळ्यात सुंदर आणि महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे यात दोन शब्द या रुपात संस्कार भारती या परिवारातील एका महत्वपूर्ण व्यक्तीचे शब्दरूपी आशिर्वाद लाभले त्यांचं  नाव म्हणजे आशुतोष अडोणी सर. मी बी ए फायनल एयर ला असतांना त्यांचं "आई" या विषयावरचं अगदी भारावून टाकणारं वक्तृत्व ऐकलं तेव्हा मनात विचार आला की जे इतकं सुंदर बोलू शकतात त्यांचं लिखाण सुद्धा किती सुंदर असेल..! पण फार कमी लोकांमध्ये उत्तम लिखाण आणि उत्तम वक्तृत्व यांची सांगड असते. पण हे दोन्ही ज्यांनी साधलं त्याचं एक उत्तम उदाहरण म्हणजे आशुतोष सरांचं लिखाण आणि वक्तृत्व. 'ही कथा नव्हे इतिहास असे ' या शीर्षकाने असलेले त्यांचे दोन शब्द आमच्या अंकात प्रकाशित झालेत याचा मनस्वी खूप आनंद आहे. त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते..!

हा अंक तुमच्या पसंतीला नक्की उतरेल अशी आशा व्यक्त करते आणि माझ्या लेखणीला विराम देते.

# दोन शब्द

श्री. आशुतोष अडोणी, लेखक आणि वक्ते

ही कथा नव्हे,इतिहास असे,
आणि हे काय ?
कामधेनू ही, हे न दुग्ध वा दुधावरील ही साय !

श्रीरामकथा ही मानवी जीवनातली साऱ्या लौकिक आणि पारलौकिक आकांक्षा पूर्ती करणारी कामधेनू आहे. "एकैकमक्षरंपुसां महापातक नाशकम !" हे रामायणाचे आश्वासन !

रवींद्रनाथ टागोर म्हणतात, "ही कथा भारत वर्षाच्या भाव भावनांची भागीरथी आहे आणि तिच्या अविरत प्रवाहाने या पुण्यभूमीची मशागत शतकानुशतके अखंड होत राहिली आहे."

रामायणात गायले गेलेले राजधर्म, यतीधर्म, कुलधर्म यांनीच भारतीय समाजाची,संस्कृतीची धारणा आणि जोपासना केली आहे. श्रीराम हे आमचे राष्ट्रपुरुष आहेत आणि रामकथा ही मानवी जीवनमूल्यांचा परमादर्श !

'श्री राम जयराम जयजयराम' हा तेरा अक्षरी महामंत्र मोक्षप्राप्तीचा सोपान मानल्या गेला आहे.

राम म्हणजे आदर्श पुत्र,आदर्श बंधू,आदर्श पती,आदर्श राजा.श्रीराम म्हणजे साक्षात धर्म

"रामो विग्रहवान धर्म:" ही खुद्द वाल्मिकी ऋषिंचीच साक्ष.

श्रीराम हीच या पुण्यपुरातन आणि नित्यनूतन राष्ट्राची ओळख !

श्रीरामच या राष्ट्राचा ध्यास आणि श्रीराम हाच जन्मापासून मृत्युपर्यंतचा प्रवास !

आदिकवी वाल्मीकींनी आपल्या स्वतंत्र सौंदर्य दृष्टीने विधात्याच्या सूक्ष्म आणि स्थूल सृष्टीतून नेमके सौंदय शोधून रामकथा लिहीली.या रामकथेने ब्रह्मांड व्यापून टाकले.रामकथेचा हिमालयासारखा उत्तुंग संभार साऱ्या भारतीय भाषांमध्ये डौलाने उभा आहे.आसेतूहिमाचल संपूर्ण भारतीय राष्ट्र रामकथेने एका सूत्रात विणल्या गेले आहे.भाषा,भूषा, प्रांत,जाती,संप्रदाय,या साऱ्या भेदांवर मात करून राष्ट्रजीवनाला भावात्मक दृष्टीने एकात्म ठेवण्याची अद्भुत क्षमता रामचरित्रात आहे.श्रीराम ही या राष्ट्राची चेतना आहे.ती केवळ कविकल्पना नाही,तो आमचा इतिहास आहे.

राम म्हणजे कर्तव्य,सीता म्हणजे दिव्य प्रेम,लक्ष्मण म्हणजे अलौकिक बंधुत्व,भरत म्हणजे परमोच्च त्याग,शत्रुघ्न म्हणजे सहृदय समता, हनुमंत म्हणजे उत्कट सेवा आणि अयोध्या म्हणजे विवेकनिष्ठ भक्ती ही कृतार्थ आणि अर्थपूर्ण जीवनाची सप्तपदी रामायणाने जगाला दिली.

रामकथा ही जशी परमात्म्याच्या अवतरणाची कथा आहे तशीच ती नराच्या नारायणत्वाच्या प्रवासाचीही गाथा आहे.रामायणाची सुरुवात वाल्मिकी ऋषींनी नारदाला विचारलेल्या एका प्रश्नाने होते,

को_स्मिन सांप्रतम लोके गुणवान कश्च वीर्यवान,
धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवाक्यो दृढव्रतः !!

या प्रश्नाचे उत्तर रामावताराचे उत्तुंग गुणवैभव मानवी पातळीवर रेखाटणारे आहे.

युद्ध कांडात एक प्रसंग आहे.रावण सैन्य आधुनिक शस्त्रांनी सुसज्ज ,प्रशिक्षित. रामाकडे शस्त्रांची कमतरता.८७ दिवस चाललेल्या युद्धात पहिले ८० दिवस रामाकडे साधा रथही नव्हता.शौर्य आणि धैर्य या दोन चाकांवर चालणारा त्याचा धर्म रथ मात्र मजबूत होता.बल,विवेक, दम आणि परोपकार हे त्याच्या रथाचे घोडे होते आणि शील आणि सत्याची पताका त्या रथावर डौलाने फडकत होती.

रावण निर्दालनानंतर रामाचा जयजयकार सुरू आहे.या युद्धात बराच काळ तटस्थ राहिलेले देवही आता त्याचे गुणगान करीत आहेत.पण सर्वोच्च विजयाच्या या क्षणीही राम मात्र नम्रपणे" आत्मानं मानुषममन्ये,रामम दशरथात्मजः ! मी मानवच आहे.दशरथाचा पुत्र राम हीच माझी ओळख" असेचं सांगतो आहे.

श्रीरामकथा हे पुरुषार्थाचे पराक्रमी पुरुषसुक्त आहे.आणि हा पराक्रम श्रीरामांनी गिरीकंदाराच्या आश्रयाला राहणाऱ्या सामान्य माणसांच्या आधारे घडवला आहे.कुठलेही रंग,रूप,अस्तित्व आणि ओळख नसणाऱ्या सामान्य माणसांनी जीवनमूल्यांच्या प्रतिष्ठेसाठी उभारलेला हा लोकलढा आहे.
विश्वकल्याण हे त्याचे भव्यदिव्य लक्ष्य आहे.

अयोध्येत राम राज्य अवतरले.राम राज्य म्हणजे सुख,समृद्धी आणि समाधानाचे राज्य.समाजातील शेवटच्या माणसाची काळजी घेणारे राज्य.राम राज्य म्हणजे धर्माचे राज्य.म्हणजेच  नीती मूल्यांचे राज्य.कर्तव्य पालनाचे राज्य. आज आपण हक्कांसाठी खूप लढतो.कर्तव्य मात्र विसरतो.राष्ट्रीय कर्तव्य पालनाच्या,मतदानाच्या दिवशी सहलीला जातो.कसे येणार रामराज्य ? राम कथा आपल्याला कर्तव्य पालन शिकवते.देव, देश आणि धर्मासाठी जगणं शिकवते. भगवान श्री रामचंद्रांनी आपल्या देशाच्या उत्तर आणि दक्षिण भागाला एकात्म केले.गिरी कंदरात राहणाऱ्या सामान्य माणसांचा पुरुषार्थ जागृत केला.जीवन कसे जगावे याची मूल्ये प्रत्यक्ष आचरणातून शिकवली. आदर्श राजा कसा असावा,त्याने प्रजेचे मत कसे शिरोधार्य मानायचे असते हे रामांनी दाखवून दिले.

जोवर जगात सूर्य चंद्र तारे आहेत,तोवर रामकथा अस्तित्वात राहणार आहे.ती शाश्वत जीवन मूल्यांचे मार्गदर्शन आपल्याला करणार आहे.

# मनी वसंत फुलला

संध्या प्रकाश दुर्गे

सुहासिनी आजी, खरंच खूप सुहास्य वदना होती, मला फारच आवडली होती. होती म्हणण्याचे कारण ती आता आमच्याकडे रहात नाही. तिला पाठवण्याची /जाऊ देण्याची खरं म्हणजे आमची इच्छा नव्हतीच. पण काय करणार ?

“सुहासिनी” हे तिचे खरे नाव नव्हतेच. हे नाव मीच तिला दिले होते. माझे थोड्या अवधीतच तिच्यावर प्रेम जडले होते. ती होतीच तशी लाघवी, सुहास्य वदना, नाकी - डोळी छान, रंग गोरापान, उंच, लांब पण पांढरे झालेले केस. पण नीटनेटकी वेणी किंवा कधी अंबाडा. कळत नव्हतं की ती आमच्या पर्यंत आलीच कशी ?
पाचवार गोल साडी तिला छान शोभून दिसत असे. जरा सुखवस्तु घरातून ती आली असावी हे तिच्या अंगकांती वरून वाटत होते.

एक दिवस माझे बाबा शेतात सकाळीच गेले होते आणि तिथे ही आजी अशीच बसलेली आढळून आली जणू काही ती प्रगटच झाली होती, बाबांना जरा नवल वाटले. कारण ती गावातली नव्हतीच पण पंचक्रोशीतही पाहिलेली त्यांना आठवत नव्हती.

बाबांनी बरीच चैकशी केली. पण ती काही फारसे सांगू शकत नव्हती. शेवटी कंटाळून बाबा आपल्या कामाला लागले. ती मात्र तशीच बसून होती. बाबांनी दिलेले पाणी फक्त तिने प्यायले होते. थकली, मळली दिसत होती ती. फारसे बोलत नव्हती. पण तिचे डोळे मात्र छान बोलके होते.

उन्हाची वेळ, आणि सूनसान झालेले शिवार ! अशावेळी तिला एकटे का राहू द्यावे, भूकही लागली असेल असे वाटून बाबा तिला आपल्या सोबत घरी घेऊन आले. हे आपले घर नाही असे वाटून ती फाटकातून आत येत नव्हती. की तिला कुठे जायचे ? काय करायचे ? काही कळत नव्हते. तिच्या चेह-यावर तिचे प्रश्न स्पष्ट दिसत होते. मग तिला मी हात धरून घरात घेऊन आली. तिची पावलं उंबरठ्यावर अडखळली. ती परत आत येईना. शेवटी तिथेच तिला पाय धुवायला पाणी दिले. पण छे ! ती ते काहीच करेना.

नुसतेच बादलीत हात बुडवून खेळत राहीली. आईला हे तिचे वागणे खटकले. वेगळेच जाणवले. आजीचा चेहरा भावना शुन्य, कोरडा (अर्थरहीत) वाटत होता. फक्त ती कोणत्याही वेळी हसत असे. त्यासाठी तिला कारणांची आवश्यकता वाटत नव्हती. शेवटी तिचे हातपाय धुवून मी तिला घरात घेऊन आली. तोपर्यंत आईने तिचे, बाबांचे आणि माझेही पान वाढले होते.

जेवतांना आई आणि बाबा तिला कितीतरी प्रश्न विचारत होते. पण त्यातल्या प्रश्नांना तिने अजूनही सविस्तर उत्तर दिलेच नव्हते. खरे तर तिचे कश्यात लक्षच नव्हते. एवढया वेळात ती पुरेसं आणि व्यवस्थित जेवलीही नव्हती. जेवतांना तिचे हात थरथरत होते आणि अन्नही तोंडापर्यंत जात नव्हते.
आईने तिला मऊ भात, वरण, तूप, मीठ कालवून दिला. तरी ते खाणे तिला जमले नव्हते. शेवटी आईने तिला जेवण भरवले. तो भात तिने कसा बसा गिळला होता.

दुपारी सर्व आवरल्यावर आई थोडावेळ लवंडली तेंव्हाच ती पण झोपली. पण खासं बोललीच नाही ती. आई वारंवार तिची चैकशी करीत होती. पण आजीला स्वतःचे नाव सांगायलाही जमले नव्हते.
जसजशी संध्याकाळ होऊ लागली तेंव्हा माझी आईच काळजीत पडली. ही कोण ? कुठली ? हीला काही त्रास आहे का ? हिला घरी ठेवून घ्यावे की नाही ? घर सोडून आली म्हणावे तर तसेही काही सांगत नाही. पण नक्कीच ”डोक्याचा“ प्रॉब्लेम दिसतो. पण तेवढी धोकादायकही वाटत नाही.

बाबा बाहेर गेले होते तेंव्हाच त्यांनी त्यांचे मित्र डॉ. काका आणि गोरे सर यांच्याशी या गोष्टीची चर्चा केली. आणि त्यानंतर त्यांनी पो. स्टेशनला रीतसर आजी सापडल्याची तक्रार केली. पण तरीही आजीची माहिती किंवा नातेवाईक सापडेपर्यंत तिला आमच्या घरीच राहू देण्याची विनंती ही केली. तिला पो. स्टे. ला दाखवण्यासाठी बाबा नेऊ लागले. तेंव्हा मात्र तिने माझा हात धरून ठेवून, बाहेर जाण्यास तिच्या पध्दतीने नकार दिला. बाबांनी धरलेला हात ती झटकून देत होती. परत तिचे डोळे बोलले. तिला भिती वाटत असावी. कदाचित ”मला पाठवू नको“ असे आर्जव करत असावी. ते तिच्या डोळयावरून कळले.

बाबांनी तिला सांगितले, “तुला सोडत नाही. आपण परत येऊ” अरे ! तिला कळले की काय ? “चल मी येते” असे मी म्हणाल्यावर ती यायला तयार झाली. पूर्ण वेळ तिने माझा किंवा बाबांचा हात सोडला नाही. तिथून परत आल्यावर ती जणू आमच्याच घरचीच झाली.

तिला नक्कीच काहीतरी प्रॉब्लेम होता असं आम्हा सर्वांना वाटत होतं. तिला अंघोळ करता येत नव्हती, कामही फारसे जमत नव्हते. ती तिचे नाव आणि बाकी गोष्टी सांगू शकत नव्हती. तिच्या बोलण्यात काही तरी विचित्र शब्द येत होते ज्यांचा सामान्य माणसाला अर्थ लागत नव्हता. कधी तरी जा, ये, लहान, मोठा हे शब्द येत. पण संदर्भच लागत नसत. खरे तर तिचे सगळेच करून द्यावे लागे. पण आम्ही तिघांनीही ही जबाबदारी घेतली.

मी तिची ब्रश, आंघोळ कपडे ही जबाबदारी घेतली. ते करून मी मग कॉलेज, टयूशनला जायची. आई तिचा नाष्ता, जेवण हे काम करीत होती आणि बाबा संध्याकाळी तिला पायी फिरवून आणत किंवा गरजे प्रमाणे मला व आईला मदत करत. अशा त-हेने ती आमच्या घरात आता छान रूळली होती. पोलिस काका एक दोन दिवसातून तिला बघण्यास किंवा चैकशी करण्यास घरी येत तेंव्हा मात्र ती घाबरून कावरी बावरी होत असे.  तेही मग कधी

कधी गणवेशात न येता साध्या कपडयात येऊन तिच्याशी बोलत, संवाद साधत. पण हा संवाद अजून तरी एकतर्फीच होता.

आमच्या घरात माझ्या लहानपणा पासून आजी नव्हतीच. बाबांची आई माझ्या जन्मापूर्वीच गेली होती. आणि बाबा माझ्या लहानपणी गेल्याने ते तर मला फारसे आठवतच नव्हते. आईचे आई वडील पण आईच्या लग्नाआधीच गेलेले होते. त्यामुळे मला आजी आजोबांचा सहवास कधी घडलाच नव्हता.

ही अचानक सापडलेली आजी, घरात आली आणि आम्हा तिघांनाही एक वेगळा आनंद झाला होता. प्रत्येक जण आपापल्या परीने तिच्यासाठी काहीतरी करून झटत होते. आता ती कधीतरी आई बरोबर देवळात, किर्तनाला, दर्शनाला जात होती. कधी तरी बाजारात जात होती. पण गर्दी पाहून आईचा पदर धरून ठेवत होती. बाजारात भाजी, फळे हे मात्र ती कधी लक्ष देऊन पहात नव्हती. पण तेच आईला पिशवी जड झाली की तात्काळ स्वतः धरत असे. हे मात्र ती आई वर हक्क दाखवून करून घेई.

कॉलेज मधून लवकर घरी आल्यावर मलाही आजीशी खेळणे हा एक चाळा होता. आमच्या घराच्या मागच्या आंगणात ती पेरूच्या, लिंबाच्या सावलीत दुपारभर बसून राहायची. तेंव्हा मी तिला हवे तसे नटवून घ्यायची. कधी नेलपेंट लाव, कधी तिचा मेकप कर तर कधी हेअर स्टाईल कर. ती छान मला सगळे करू द्यायची. मध्येच खुद्खुद् हसायची. त्या नेलपेंट ला ती उत्सूकतेने निरखून बघयची. घरात जाऊन आईला ते हळूच दाखवायची म्हणून अशी ही आजी मला फार आवडली होती. खरे तर तिच्याकडून गाणी, गोष्ट ऐकणे ही माझी एक हौस पूर्ण होता नव्हती. पण तरी मी तिच्या सहवासाचा आनंद मात्र पुरेपूर उपभोगत होती.

आजीला आमच्या घरात येऊन तीन - चार महिने झाले होते, पण अजून तिचा ठावठिकाणा कळत नव्हता. आम्हीच काय, पोलीसांनाही तिचे घर-दार कसे शोधावे हा प्रश्न होता. अजूनही तिची नाव पत्ता सांगण्या इतकी प्रगती नव्हतीच आता ती ”छान आहे“ हा शब्द वारंवार म्हणत होती. पण अजूनही तिचे शब्द म्हणावे तितके स्पष्ट नव्हतेच. ती शेतावर बाबांबरोबर गेली तर बराच वेळ मातीशी खेळ करत बसून रहायची. सगळया झाडांना हात लावून पहायची.

माझे नाव तिला म्हणता येत नव्हते. पण माझ्याकडे बघून मला कधी कधी ”अंजली“ म्हणायची.

अंजली कोण हे शोधण्याचा आम्हाला चाळाच लागला होता. पण छे ! आजी काही सांगेचना. शेवटी तिचा, तिला वेळ देणे हाच एक उपाय उरला होता. मात्र तिला जमो अथवा न जमो आमच्या प्रत्येक कामात तिला घ्यायचे,

तिला काही ना काही करू द्यायचे आणि तिचे सतत निरिक्षण करीत रहावे असा उपाय डॉ. काकांनी सुचवला. आणि तिचा काहीच त्रास नसल्याने तिला आमच्या घरीच राहू द्यावे, असे सर्वानुमते ठरवले गेले.

आमचे गाव, मध्यप्रदेश छत्तीसगढ असलेले एक छोटे खेडेच होते म्हणा तर खेडयातील जीवन जसे शांत, संथ असते त्याप्रमाणे ते संथ होतेच. भौतिक सुविधा जरी लोकांकडे असल्या तरी अजून वातावरण, आणि वृत्ती, कामकाज, उद्योग धंदा हे मात्र खेडयानुसार अजूनही टिकलेले होते. लोक शेती करीत आणि अगदी साधे पणाने रहात होते. जरी राज्याच्या सीमेवरील गाव असले तरी आजूबाजूने पूर्ण जंगल होते.

आमच्याच घराचा विचार करता घरात फ्रिज, मिक्सर या गोष्टी होत्या वीज, पाणी, संडास या सारख्या सुविधा होत्या पण घर अजूनही मातीचे होते. दर एक दोन महिन्यातून घराच्या भिंती आई शेणाने सारवित असे. घराची जमीन मात्र रोज किंवा एक दिवसा आड सारवावी लागे. तसेच इकडच्या पध्दतीनुसार घराचे रंग, त्यावर काढलेले चित्र, रांगोळया यांनी घर शोभून दिसत असे.

हळू हळू आमच्या लक्षात आले की, आजी आमच्या घराच्या सारवलेल्या जमीनीवर हळूवारपणे हात फिरवून पाहते. जणू ते तिला ओळखीचे वाटते. कधी कधी आई घर सारवते तेंव्हा आजी शेणाचा त्या पाण्याचा वास घेऊन बघते. तो वास कदाचित श्वासात साठवून ठेवते. आमची पाणी तापवण्याची चूल आहे तिथेही ती बरेचदा जाऊन बसते. तिथे ती काय बघते हे मात्र कळत नाही.

या सगळया तिच्यातल्या बदलांची माहिती आम्ही पोलीस काकांना देत होतोच. कधी चुलीजवळ बसून ही काही जीवाचे बरे वाईट तर करणार नाही नं, ही शंका येऊन आम्ही तिघांपैकी कोणी एक तिच्याजवळच थांबत होतो.

आमचा हा प्रांत सगळा हिंदी छत्तीसगढी भाशा बोलणा-यांचा होता. काही थोडी घरे गावात आमच्या सारख्या मराठी बोलणा-यांची पण होती. आणि आजी मराठी बोलणारी होती त्यामुळे तिला आमच्याकडे ठेवले होते. आता पोलीसांनी मात्र तिचा शोध घेण्याचे ठरविले आणि त्यांनी तिचे फोटो पोस्टर बनवून विविध ठिकाणी पोलीस स्टेशनला पाठविले इतर विविध ठिकाणी लावले. तरीही हवा तसा तपास मात्र लागत नव्हताच.

दरम्यान होळीचा सण आला. आईची वेगवेगळया पदार्थ तयार करण्याची लगबग सुरू झाली. आजूबाजूच्या बायका एकमेकींच्या होडीने वेगवेगळया पक्वान्न बनवित होत्या. आमच्या घरीही मराठी पक्वान्नां बरोबरच गुजिया, ठेठारी, खुरमी, अइरसा (अनारसा) , मालपुआ असे छत्तीसगढी पदार्थ बनविणे सुरू होते. आजुबाजुच्या घरात नवविवाहित मुली माहेरी येऊ लागल्या होत्या. रोज घराघरांतून ”फाग उत्सव, होरी उत्सव“ गीत गायन

ही ऐकू येत होते. परंतू आजी मात्र जरा उदास वाटत होती. आई आजीला वेगवेगळया ठिकाणी नेत होती. उलट आजी मात्र बाबांना रोज हातवारे करून शेताकडे जायला म्हणत होती. होरी उत्सवाच्या 3-4 दिवसात बाबांना तिला शेताकडे न्यायला जमले नाही.

एक दिवस अचानक आजी घरातून निघून गेली ............

सगळी होरी उत्सव, विविध रंगांनी सजलेला असून आम्हाला रंगहीन भासत होता. घर सुने सुने भासत होते. मुख्य म्हणजे आजी घर सोडून गेली, यात आमचेच काहीतरी चुकले हे आम्हा तिघांनाही वाटत होते. आम्हाला स्वतःच्याच घरात जायची इच्छा होत नव्हती.

ती कधी गेली  हेच कळत नव्हते. गावात सगळी कडे विचारपूस, शोधाशोध करेपर्यंत संध्याकाळ झाली. पोलीसात तक्रारही दिली. त्यानंतर त्या दिवशीचा शोध थांबवावा लागला.

घरी एवढे पक्वान्न असूनही आम्ही उपाशीच होतो. तिघांच्याही डोळयात झोप नव्हती. मी आणि आई किती तरी वेळ रडत होतो. बाबा जरी आम्हाला सावरत होते तरी ते स्वतः निराश झाले आहेत लक्षात येत होते. रात्री उशीरा पर्यंत गावातील काही लोक आमच्या मागच्या अंगणात आजीच्या आवडत्या पेरूच्या लिंबाच्या झाडाखाली बसून होते. उद्या कुठे शोध घ्यावा या विषयी चर्चा सुरू होती. उद्या एक टीम आजूबाजूच्या गावात गाडीवर जाऊन शोध घेणार होती. आणि एक टीम गावात व आसपास असणा-या विहीरी, शेततळे, जंगलात शोध घेणार होती.

दुस-या दिवशी शोध मोहिम सुरू करून आठ दहा तास झाले तरी आजीचा शोध लागला नाही. तेंव्हा आमच्या मनात तिचे बद्दल वाईट विचार येऊ लागले. अशा परिस्थितीत आजही आमच्या घरची चूल पेटली नाहीच. आईने बळजबरीने मला काहीतरी खायला घातले.

वातावरणात खूप उत्साह होता. रंगबिरंगी फुले फुलली होती. वसंत ऋतू दर्षविणारी हिरवी पोपटी पाने जागोजागी दिसत होती. आंब्याच्या मोहोराचा सुगंध आसमंतात दरवळत होता. पिवळी, पांढरी विविध रंगी फुले फुललेली होती. कोकीळेसहीत वेगवेगळे पक्षी आपल्याशीच खुश होत कूजन करीत होते. गुलमोहराच्या लाल फुलांचा, पळसाच्या केशरी फुलांचा आणि बहावाच्या पिवळया फुलांचा गालीचा जमीनीवर जणू अंथरला असे भासत होते. वातावरणात उमेद, उल्हास जाणवत होता. आणि सणाच्या आनंदाने तर ज्या वातावरणात चार चांद लावले होते. मी बरेच वेळा या काळात शेतात जात असते कारण आमच्या शेताच्या कुंपणावर अशी बरीच सुंदर फुले देणारी झाडे आहेत. या दिवसांत त्या झाडांवर सुंदर फुलांखेरीज सुंदर फुलपाखरे दिसतात.

पण सध्या आमचे चित्तच था-यावर नव्हते. तरी आई त्या परमेश्वराला आळवत होती,

उन्हाळयाने केला कहर

तरी गुलमोहराला येतो बहर

संकटानी केला कहर

हे देवा ! तरी उमेदीला येऊ दे बहर.

पण अजून देवाने आमचे काही ऐकलेच नव्हते.

मला मध्येच आठवले, आमच्या शेतात सुंदर फुले फुलली असतील. जाऊन बघायला हवे. आणि अचानक लक्षात आले की, आजी बाबांना "शेतात जाऊ या" म्हणत होती. तिला शेतावर शोधायला हवे. कोणी तिकडे पाहिलेच नव्हते.

बाबांनाही माझे म्हणणे पटले होते. बाबा तातडीने शेताकडे जायला निघाले. मी पण बाबांसोबत जायचे ठरविले.

शेतातील सगळी झाडे सुंदर फुलली होती. लाल पिवळे, निळे, पांढरे केशरी आणि पिवळा पळस सुंदर फुलला होता. नेहमी वसंत ऋतूत शेतात येण्याची मज्जाच निराळी होती. मी लहानपणा पासून नेहमी शेतात हा आनंद घेत आली होती. आईने या झाडांची विशेष ओळख जणू मला करून दिली होती. या फुलांच्या सहवासात मी मंत्रमुग्ध होऊन फिरत असे.

आजीला शोधायला आलेली मी, फुलांच्या सहवासात तिला विसरून प्रत्येक झाडाजवळ फिरत होते. आणि काय गंमत मला तिथे पिवळया, केशरी पळसाच्या झाडाजवळ आजी झोपलेली आढळली. मी बाबा आणि इतरांना बोलविले. अत्यानंदाने मी नाचू लागले. माझी फुले आणि फुलांसारखी मोहक आजी मला एकाच ठिकाणी भेटले.

ओह ! किती बरे वाटले, आजी दिसल्यामुळे. सगळीकडे क्षणात उत्साही, आनंदी वातावरण झाले. असे कसे आपण सगळे शेतातच शोधायला विसरलो ? जाऊ द्या आजी सापडली हेच तर महत्वाचे होते नं.

आजीला मी लगोलग उठवले. ती खूप उदास वाटत होती. कदाचित रात्री ती बराच वेळ रडत बसली होती. डोळे सुजले होते. चेह-यावर सुकलेले अश्रूंचे ओघळ तसेच दिसत होते. चेहरा लहान वाटत होता. पण मला पाहताच तिने मला मिठी मारली. आनंदाने समाधानाने चेहरा फुलला.

आज मला तिच्या चेह-यावर समाधान दिसले. “अर्थपूर्ण” हावभाव दिसले. तिला खूप बोलावेसे वाटत होते. तिने मला “श्वेता” म्हणून हाक मारली. माझे नाव श्वेता आहे, हे ती रोज आई, बाबा, माझ्या मैत्रिणीं कडून ऐकत होती. आज तिच्या तोंडून माझे नाव अगदी स्पष्टपणे आले होते. माझ्यासाठी हा खूप आनंदाचा क्षण होता.

आजीला घेऊन आम्ही घरी आलो. आईने तर आजीला छान ओवाळले. तिची दृष्टही काढली. आधी तिला आंघोळ करून, जेवायला वाढले. ती खूप व्यवस्थित सर्व करत होती. आज स्वतःच्या हाताने नीट नेटकी आंघोळ केली, चवीचवीने, आस्वाद घेत न सांडवत जेवणही केले. आम्हा सर्वांना आनंद तर होताच परंतु तिच्यातला हा बदल पाहून आश्चर्याचा सुखद धक्काही बसला होता.

आता तिला किती बोलू (आणि किती नाही) असे झाले होते. तिने शेतात जाण्याचा वृत्तांत सांगायला स्वतःच सुरूवात केली. आता तिची कथा तिच्याच तोंडून ऐकू या.

“माझे नांव विमल. मी ×××× जिल्हयातल्या बोरगाव ची राहणारी. आता बोलायला शब्द सहज सुचताहेत म्हणून बोलण्याची मजा मला घ्यायची आहे. बरेच दिवस मनातून बोलावेसे वाटे पण शब्दच सुचत नसत काही वेळेला काही क्रिया कशा कराव्यात ते ही कळत नव्हते. त्यामुळे स्वतःची आंघोळ, कपडे, इतर काही काम मला करणेही जमत नव्हते. पण तुम्ही सर्वांनी मला अशाही परिस्थितीत सांभाळले. त्या करीता मी आपल्या सर्वांची माफी मागते.

आजी अगदी अस्खलीत हिंदी बोलत होती. ती हिंदी बोलत होती कारण हे सगळे इतर लोकांना कळणे गरजेचे आहे हे तिला समजले होते. हया लोकांची भाषा हिंदी आहे हे ही तिला समजले होते.

आजी स्वतः पुढे बोले पर्यंत पोलीस ही येऊन पोहचले होतेच. तिने त्यांना तिच्या मुलाचा आणि मुलीचाही पत्ता त्यांना सांगितला. मो. नंबर मात्र हरवल्यामुळे तेवढा तिच्या लक्षात नव्हता. पोलीसांनी तातडीने ××× जिल्हयाच्या बोरगाव चैकीला संपर्क केला. तिकडून काही वार्ता येई पर्यंत आजी पुढे बोलू लागली.

माझे आता वय 78 चे आहे. आणि मी 58 व्या वर्षी रिटायर झाली. तेंव्हापासून गेल्या दोन वर्ष पूर्वी पर्यंत प्रकृतीने ठणठणीत होते. पण गेल्या दोन वर्शात मला विस्मरणाचा त्रास सुरू झाला. औषधोपचार सुरू होता पण म्हणावा तसा औषधांचा फायदा दिसत नव्हता. मी यातून स्वतःला बरे करण्यासाठी डॉ. च्या सल्ल्यानेच आहार, विहार, व्यायाम असे चैफेर प्रयत्न केले. पण हा आजार फारसा बरा होत नव्हता. कधी मी इतरांची नावे, घरातील वस्तूंची नावे, रस्ते अशा गोष्टी विसरते. तर कधी आंघोळ करणे, कपडे बदलणे, वेणीफणी करणे तर कधी जेवण कसे करायचे हे पण विसरते. घरातील लोकांना याचा त्रास होतो हे पण मी विसरते आणि त्याच्यावरच मी चिडते.

अशा परिस्थितीत मी घरातून बाहेर पडून किती दिवस / वर्ष झाले हे मात्र मला आठवत नाही. कुठे जात होती ? कशी रहात होती ? कुठे आणि काय खात होती हे देखील मला माहित नाही. आणि अर्थातच इथे मी कशी पोहचली ते पण मला माहित नाही.

पण आज अचानक मला हे का समजू, आठवू लागले ते ही मला कळत नाही. पण गेल्या 3-4 दिवस आधी पासून एक वेगळा गंध वातावरणात जाणवत होता. म्हणून मी  वारंवार ”शेतात जाऊ“ म्हणून सुचवित होती पण बाकी सगळे होळी सणाच्या तयारीत असल्याने आणि मी जे खाणाखुणांनी सांगत होते ते कदाचित न कळल्यामुळे मला कोणी शेतात नेलेच नाही.

इतर काही समजत नसल्याने, त्या सुगंधाचा मला वारंवार आभास होत होता. तो कसलासा सुवास मला त्रासदायक वाटत होता. म्हणून मी माझ्याही नकळत त्याचा सुवासाचा माग काढत, सुदैवाने, आपल्याच शेतात पोहचली. आता मला त्या सुवासाचा पूर्ण मागोवा घेता येत होता.

हा सुवास मी कुठे अनुभवला आहे हे मात्र मला आठवत नव्हते त्याचा विचार सुरूच होता. हळु हळु जणू मेंदूवरील धुक्याची चादर विरळ होत होती. मला एक एक गोष्टी समजू लागल्या.

सर्वात महत्वाचे की माझे नाव “सुहासिनी आजी” नाहीय. तर ते विमल आहे. मी या गावची नाही. माझे गाव दुसरे आहे. पण मला लहानपणीचे काही संदर्भ त्यात लागत होते. जसे की, माझ्या घरी शेती आहे. शेतात वेगवेगळे वृक्ष होते त्यांना आलेला बहर दिसत होता. रंगीबेरंगी फुले होती. आणि एक परकरी पोर वेगवेगळया फुलांना झाडांना हात लावून बाबा कडून संपूर्ण माहिती घेत होती. सुगंध अनुभवत होती. त्यामुळे तो सुगंध तिच्या पक्का स्मरणात राहिला होता. हळू हळू समजले ती लहान पोर म्हणजे लहानपणची मीच होते.

आई, बाबा, दादा सगळेच मला जाणवत होते. त्यांचे आवाज हे सगळे मला माझ्या बालपणीचे आठवत होते. आमच्या बालपणीच्या सगळया गमती आठवत होत्या. पण मी एवढी लहान तर नक्कीच नाही. आता मी काय करू? कसे मला समजणार ? किती वेळ माझा विचार सुरू होता, आणि कितीवेळ मी रडत होती कोण जाणे?

मी एकेका पायरीवर राहून काय काय आठवते ते पाहू या असे ठरवले. आणि आई बाबांचे नाव आठवले. शाळा, मैत्रिणी तो आमचा दहावा वर्ग, पुढचे शिक्षण, नंतर लागलेली नोकरी, दादा, तो सध्या रहात असलेले ठिकाण हे ही लक्षात आले. पण दादा तर दोन वर्षापूर्वीच गेला हे ही आठवले.

दरम्यान रात्र झाली. अंधार पडला आणि मला भिती वाटू लागली आता परत जाणेही जमणारे नव्हते. कारण कुठून आलो आणि कुठे परत जायचे या विषयी डोक्यात काहीच नव्हते. पण आपण अंधारात  आहोत हे वास्तव मात्र

कळत होते, आता समजत असल्याने अंधाराबरोबर भितीची जाणिव मला होत होती.

विचारांच्या नादात कधी तरी झोप लागली पण त्यातही कोणी छोटे मुलं दिसत होते. मेंदूवर फार जोर दिल्यावर लक्षात आले ते माझेच मुलं आहेत. आता खेळ सुरू झाला त्यांच्या प्रत्येक बाबी आठवून पहायचा माझे नाव, पतीचे नाव, मुले, त्यांचे राहण्याचे ठिकाण, त्यात्या वेळच्या शाळा जणू एक चित्रपटच डोळयापुढून जात होता.

अचानक मेंदूवरील धुके पूर्णपणे निवळले गेल्याने मला, मी, माझे कुटुंब, मुलगा, सून, नातू, मुलगी, सगळे घर दार हे आठवू लागले. शेवटी रात्रीच त्या अंधारात मी जागी होऊन रडत बसले. ही सगळी माहिती मी कुणाला, कशी, कधी सांगू ? या विषयीची काळजी मला वाटली. आणि समजा मी परत विसरली तर ? तर पुन्हा किती दिवस अशी इथेच राहू ? हे प्रश्न मला रात्रभर छळत राहिले. आणि काहीच पुढचा उपाय दिसत नसल्याने अखेर रडता रडता मी तिथेच झोपी गेली. आयुष्यात असे कधीच न घडल्याने मला स्वतःबद्दल किती तरी गोष्टी कोड्यासारख्या वाटत होत्या. मी कधी घरून निघाली ? चालतच कुठपर्यंत येऊन पोहचली ? मलाच हे विस्मरण का होते ? आता अचानक हे सर्व कसे आणि का आठवले असेल ? हया प्रश्नांची उत्तरे मला डॉक्टर खेरीज कोण देणार ?

पण मी आपल्यापरीने या प्रश्नांवर विचार करीत होती. मला कदाचित त्या येणा-या ठराविक सुगंधाने जागृती आली होती. लहानपणी वर्षानुवर्षे अनुभवलेले ते विविधरंगी निसर्ग सौंदर्य, मोहाच्या फुलांचा, सप्तपर्णीचा तो मोहक सुवास, मला आठवत होता. पानगळी नंतर येणा-या कोवळया पानांचा तो सुवास, आंब्याला आलेल्या मोहराचा सुवास, कडुनिंबाच्या फुलो-याचा वास, नव्यानेच धरलेले करवंद, कारवी यांचा एक वेगळा वास आणि वसंत ऋतू हे समिकरण लहानपणा पासूनच डोक्यात फिट्ट बसलेले होते. तेच काहीसे आठवून तोच तो सुवास जाणवून मी चलबिचल होत होती. काहीतरी अस्वस्थता मनात जाणवत होती. पण ते समजायला, सांगायला मला शब्दच सापडत नव्हते. त्या गोष्टीचा काहीतरी शोध घेणे आवष्यक वाटल्यानेच मी कुठल्यातरी तंद्रीत शेताकडे जाण्याचा रस्ता धरला. जणू काही तो वसंतातला मोहक सुगंध मला स्वतःकडे आकर्षित करत होता.

शेतात गेल्यावर सुंदर फुललेला बहावा, तो केशरी, पिवळा पळस विविध रंगी बोगनवेल, पांढरा चाफा, पांढराच अनंत या सगळयांनी माझ्या चित्तवृत्ती आनंदित, सुगंधीत करून दिल्या होत्या. पुन्हा पुन्हा मला काहीतरी सापडत असल्याची पण ते काय ? हे कळत नसल्याने आलेली अस्वस्थता त्रासदायक वाटत होती. आणि मग हळू हळू मेंदूवरील, मनावरील धुके विरळ विरळ होत गेले. आणि माझ्या मनातला वसंत मला गवसत गेला.

खूप छान वाटतंय आता हे सगळं सांगून आणि सांगता येतय, आपल्याला आठवतंय ते जाणवून. म्हणून हा वसंत माझ्या जीवनात असाच टिकून राहू दे !

# रामायण सत्य की कल्पना?

मृण्मयी कतर्णी - सांबरे

रामायण हा महर्षी वाल्मिकींचा काव्यग्रंथ विश्वमानवाचा सांस्कृतिक मार्गदर्शक आहे. अजूनही जगात याच्या शेजारी मानाचा पाट मांडावा असा दुसरा काव्यग्रंथ नाही. रामायणामुळे राम आणि रामामुळे रामायण गेली हजारो वर्षे घराघरांत देवरूप होऊन राहिले आहे! रामायणात काय आहे, यापेक्षा  काय नाही? असेच विचारायला हवे. आई-वडील, पती-पत्नी, बंधू-बंधू, जावा-जावा, दीर-वहिनी, दास-दासी, शत्रू-मित्र, सापेक्ष-निरपेक्ष, दया-क्रौर्य, दारिद्र्य-ऐश्वर्य हे सर्व काही या रामायणात आहेच. शिवाय अपेक्षाभंग, त्रास, पीडा, दुःख, संकटे, अपहरण, क्लेश हे सर्व तेथे आहेच. जसे प्रत्येक संसारी कुटुंबात जे आणि जसे असते, ते आणि तसे चलन-वलन या रामायणातही आढळते, त्यात विशेष काही नाही. मग या महाकाव्याचा विरोध तरी का?

रामायणाचा पाया त्यागाधिष्ठित आहे. सम्राट दिलीप, रघू, अज व राजा दशरथाच्या सूर्यकुलाचा पारंपरिक पायाच त्यागाचा आहे. सूर्य काय करतो? तर उदयापासून अस्तापर्यंत फक्त प्रकाशाचे वितरण करणे, सर्व प्रकारच्या अंधारांचा नाश करणे, हेच त्याचे जीवितकार्य असते. त्यामुळे तोच त्यागाचा प्रकाशगुण या सूर्यकुलाचा मूलाधार ठरला आहे. हा पिढीजात संस्कारच राम व त्याच्या बंधूंनी आणि साऱ्या कुटुंबाने शिरोधार्ह मानला.राम राज्यत्याग करतो, भरत सिंहासनाचा त्याग करतो, लक्ष्मण-सीता सुखासीनतेला नाकारतात, हनुमंत त्यागमूर्तीच असतो. बिभीषण लंकेचा त्याग करतो, सारी वानरसेना जीवितत्याग करते, सागर अहंकाराचा त्याग करतो! तात्पर्य या सूर्यकालाच्या छायेत व रामाच्या संपर्कात जे जे येतात ते ते सर्व त्यागनगरीचे नागरिक होऊन जातात!

रामाने सत्ता-संपत्ती-सुखाविलास यांचा त्याग करताच तो लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन बसला! रामाने पिताज्ञा म्हणून अयोध्येची वेस ओलांडली आणि रामकीर्ती कालातीत व शब्दातीत होऊन गेली. रामाने अयोध्येची मर्यादित भूमी सोडली व तो अमर्याद असा विश्वमानव होऊन गेला! रामाने सत्तात्याग केला, आणि तो कीर्तीसंपन्न झाला. राम निष्कांचन वनवासी होताच कालपुरुषानेच त्याला 'मृत्यूलोकीचा आपला दूत' म्हणून प्रतिनिधित्व बहाल केले! रामाने राजसिंहासन सोडले, आणि तो लोक सिंहासनावर सदासाठी आरूढ झाला!

रामायणाचे आणखी एक वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे वाल्मिकीच्या प्रतिभेचा प्रकाशझोत सतत रामावरच असतो. प्रसंगपरत्वे तो झोत कधीमधी भरत, लक्ष्मण, हनुमंत, बिभीषण, रावण, इंद्रजीत, सीता यांच्यावरही पडलेला दिसतो. परंतु तो तेवढ्यापुरताच असतो. मुख्य झोत आदिपासून अंतपर्यंत रामावरच राहतो. कारण वाल्मिकींना  फक्त रामचरित्रच सांगायचे असते. म्हणूनच रामाला बोलावण्यासाठी विश्वामित्र येतात, त्रातीकेचा वध राम करतो, अहल्येचा (अहिल्या नव्हे!) उद्धार राम करतो. धनुर्भंग करून राम सीतेला वरतो, इथपासून

तो थेट रावणवधापर्यंत यत्रतत्र सर्वत्र रामाचाच बोलबाला रामायणात दिसतो. त्यामुळे रामायणाचा नायक कोण? असा प्रश्न कधी पडत नाही.

या महाकाव्याचा आणखी एक विशेष आहे. तो म्हणजे यातील मुख्य पात्र दुःखाच्या छायेत वावरत असते. दशरथ, कौसल्या, सुमित्रा, कैकेयी, राम, लक्ष्मण, सुग्रीव, सीता, बिभीषण, रावण इत्यादी सर्व व्यक्तींना दुःखेच भोगावी लागतात. दशरथाला पुत्रवियोगाचे दुःख, भरताला बंधुवियोग, कैकेयीला अधःपतित दुःख, उर्मिलेचे मूक दुःख, लक्ष्मणाचे वैफल्य, दुःख, सीतेचं अंत नसलेले दुःख, बिभीषणाचे कर्तव्यदुःख, रावणाचे अहंकार दुःख आणि श्रीरामाचे दिव्य दुःख! अशी ही रामायणातील दुःखमालिका आहे!

रामायण झाले की नाही, ते खरे की काल्पनिक ते ऐतिहासिक की भावनिक याचा ज्यांना चर्चा किंवा संशोधन करावयाचे असेल त्यांनी ते जरूर करावे, मी त्यांचा आदर करते. परंतु संबंधितांनी ‘रामायण’ महाकाव्य म्हणजे भारताचा सर्वात प्राचीन असा काव्यमय सांस्कृतिक इतिहास आहे, हे प्रथम ध्यानी घ्यावे. या रामायणावर व रामचरित्रावर आधारित या भारताची सांस्कृतिक जडण-घडण व त्याचा वैभवी उत्कर्ष झालेला आहे आणि आजही या राष्ट्रातील अस्वस्थ भारतीयांना संयमाचा व शांततेचा संदेश देणारा तोच एकमात्र ग्रंथराज आहे, हे विसरून चालणार नाही!

# ऋतुराज वसंत

डॉ. मानसी सगदेव - मोहरील

अगदी रणरणत्या उन्हातही विविध रंगांची, गंधाची उधळण करणारा, मनाला सुखावणारा....वसंत..
पहाटे हलक्याश्या गारव्यात कोकीळेचे मधुर गीत ऐकताना ज्या सुखाची प्राप्ती होते ते सुख केवळ वसंतातच...
सगळ्या झाडांना ह्या काळात नविन पालवी फुटलेली असते, नवा बहर येऊ पाहतो, पक्षी सुद्धा उत्साहात ह्या सगळ्या बहराचं स्वागत करतात. त्यांच्या गुंजनानी पृथ्वीचा कणकण खुलून जातो. वसंत म्हणजे हिरवंगार, खुललेलं, भरभरून उत्साहात वाहणारं तारुण्य....
मनाला एक नवी उभारी देणारं, पुन्हा पुन्हा अंतरमनाला जिवंत करणारं निसर्गाचं एक वरदान..
मला वसंत म्हंटला ना की एक आठवतं.
गीतेत विभूतीयोगाच्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ‘ पृथ्वीवरचा ‘कुसुमाकर’ म्हणजेच वसंतऋतु तो म्हणजे मीच!!'
खरंय! किती रुपं त्या कृष्णाची अन् किती रुपं ह्या वसंताची....
संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

‘जैसे ऋतुपतीचे द्वार ,वनश्री निरंतर,
वोळगे फळभार,लावण्येसी!’

जिथे संत ज्ञानेश्वरांनाही आपल्या काव्यात वसंताला गुंफण्याचा मोह आवरला नाही, तिथे सामान्यांची काय बिशाद...

या पृथ्वीवर असा एखादाच कुणी असेल ज्याला वसंतानी वेड लावलं नाही.. कुणी स्वतःच्या शब्दात त्याला मांडलं, कुणी सुरांत गुंफलं, कुणी चित्रात रंगवलं, कुणी नृत्यात सजवलं!
कुणी श्रृंगाराचं वर्णन केलं, कुणी वेदना, कुणी भक्ती तर कुणी करुणा..

पण प्रत्येकानी वसंताला आत, खोल हृदयात जपलंय, जगलंय!! म्हणूनच तर मराठी आणि हिंदी साहित्यात वसंताची एक वेगळीच जागा आहे. सिनेमांमधून सुध्दा ह्या वसंताच सौंदर्य आपल्याला अनुभवता येतं.
नुसतंच निसर्ग सौंदर्य नाही तर वसंतातले आपले सणवार सुद्धा किती हवेहवेसे असतात. वसंत पंचमी, होळी गुढीपाडवा, रामनवमी ह्या सगळ्या सणांमुळे वातावरण कसं आल्हाददायक असतं.
बघायला गेलं तर ह्या ऋतूचं आणि सगळ्या सणांच प्रतिकात्मक रित्याही नातं जोडल्या गेलं आहे.
मला पाडगावकरांच्या काही ओळी आत्ता आठवतात पाडगांवकर म्हणतात-

तुला पाहिले ऋतुंऋतुंतुन, फुलाफुलांतून
त्या गगनातुन, या मातीतून, स्थितिगतीतून
संघर्षातुन , सुखदुःखांतून , व्यथेव्यथेंतून
या सृष्टीतून अन भावतीच्या मानवतेतून
रे कसे शोधू तुज वेड्यापरी मी तुलाच टाकून?
मी कधीच नाही म्हटले की तू दे मज दर्शन..

खरंच, शोधायला गेलं तर ह्या सृष्टीतच इशत्व सापडतं! शेवटी त्यानीच निर्माण केलेलं हे चक्र!! वसंताच्या ह्या रुपड्यावरच हिंदी गाणं मला आवर्जून आठवतं ते बंसत बहार मधलं पं. भीमसेन जोशींनी आणि मन्ना डे नी गायलेलं गाणं!

ह्यात शंकर जयकिशन ह्यांनी संपूर्ण वसंतच आपल्यापुढे आणून ठेवलाय.

त्याच्या ह्या ओळी..

केतकी, गुलाब, जूही, चम्पक बन फूले
रितु बसंत, अपनो कंत गोरी गरवा लगाए
झुलना में बैठ आज पी के संग झूले
केतकी, गुलाब, जूही, चम्पक बन फूले

गल-गल कुंज-कुंज, गुन-गुन भँवरों की गुंज
राग-रंग अंग-अंग, छेड़त रसिया अनंग
कोयल की पंचम सुन दुनिया दुख भूले
केतकी, गुलाब, जूही, चम्पक बन फूले

मधुर-मधुर थोरी-थोरी, मीठी बतियों से गोरी
चित चुराए हँसत जाए, चोरी कर सिर झुकाए
शीश झुके, चंचल लट गालन को छू ले
केतकी, गुलाब, जूही, चम्पक बन फूले

मराठी साहित्यातही वसंतचं फार सुंदर वर्णन केलंय. प्रत्येक भावनेला वसंताशी जोडलंय. खरं तर एखाद्या कवी करता प्रत्येक ऋतू हा पर्वणीच असतो मनातलं सारं काही त्या ऋतूला सांगण्याकरता. त्या ऋतू शी एकरुप होताना, त्याच्या मनाचा एक एक पदर हळुहळू मोकळा होत जातो आणि त्याचे रुपांतर कवितेत होते...

असंच स्वतःला कवितेत उतरवणारा वल्ली म्हणजे सुरेश भट!! सुरेश भटांच्या कवितांच, ग़ज़लांचं एक वैशिष्ट्य असतं, ते म्हणजे, भट साहेब जसे आहेत तसे ते त्यांच्या कवितांमध्ये आपल्याला दिसतात, भेटतात....

त्यांनी त्याच्या वसंतावर लिहीलेले काही शेर आणि कविता -

मनातल्या मनात मी तुझ्या समीप राहतो
तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो
अशीच रोज नाहुनी
लपेट उन्ह कोवळे
असेच चिंब केस तू
उन्हात सोड मोकळे
तुझा सुगंध मात्र मी इथे हळूच हुंगतो !
तुला न सांगता तुझा वसंत रोज पाहतो
अशीच रोज अंगणी
लवून वेच तू फुले
असेच सांग लाजुनी
कळ्यांस गूज आपुले
तुझ्या कळ्या, तुझी फुले इथे टिपून काढतो !
अजून तू अजाण ह्या
कुंवार कर्दळीपरी
गडे विचार जाणत्या
जुईस एकदा तरी
'दुरून कोण हा तुझा मरंद रोज चाखतो...?'
तसा न राहिला अता
उदास एकटेपणा
तुझीच रूपपल्लवी
जिथे तिथे करी खुणा
पहा कसा हवेत मी तुझ्यासवे सळाळतो !

पुढल्या शेरातली करुणा बघा

आला जर जवळ अंत
का हा आला वसंत

हाय फुले टिपण्याचे वय निघुन गेले
देखावे वेचण्याचे वय निघुन गेले

आणि हा विरहातला वसंत...

तू नभातले तारे माळलेस का तेंव्हा
माझिया स्वप्नांना गाळलेस का तेंव्हा

कालच्या वसंताला ठेवतेस का नावे
वायदे फुलायाचे पाळलेस का तेंव्हा

येई वसंत हा गात गात
माझाच शोध होई मनात
होई वनात शोकार्त गंध
सार्या कळ्यांस माझाच छंद

जाणिवेच्या अंधारात झाले ओझे हे मी पण
सरलेल्या वसंताची नको देऊ आठवण

तेंव्हा मला फुलांचा कोठे निरोप आला
माझे वसंत होते सारे उदास वाणे

- सुरेश भट

सुरेश भटांनी प्रत्येक रसाला ह्या वसंतात उतरवलंय. अगदी आपल्याला आपलंच वाटेल असं हे काव्य.....

निसर्गाला भरभरून दाद देणारा आणखी एक कवी म्हणजे सुधीर मोघे..

तरीही वसंत फुलतो

प्रत्येक जन्मणारा क्षण शेवटास ढळतो
तरीही वसंत फुलतो......................!!
उमले फुले इथे जे, ते ते अखेर वठते
लावण्य, रंग, रूप, सारे झडून जाते
तो गंध, तो फुलोरा, अंती धुळीस मिळतो
तरीही वसंत फुलतो......................!!
जे वाटती अतूट, जाती तुटून नाते
आधार जो धरावा, त्यालाच कीड लागे
ऋतू कोवळा अखेरी, तळत्या उन्हात जळतो
तरीही वसंत फुलतो......................!!
तरीही फिरून बीज, रुजते पुन्हा नव्याने
तरीही फिरून श्वास, रचती सुरेल गाणे
तरीही फिरून अंत, उगमाकडेच वळतो.......
उगमाकडेच वळतो.........................!!
प्रत्येक जन्मणारा क्षण शेवटास ढळतो
तरीही वसंत फुलतो......................!!

-सुधीर मोघे

आता जस मराठी साहित्यात वसंताला एक विशेष स्थान आहे तसच हिंदी चित्रपट सृष्टीत देखील. यश राजने भारताला युरोपातला वसंत दाखवला आणि बसंत ऋतू के मायने बदल दिए!

साडी नेसलेल्या सुंदर ललना रेखा, श्रीदेवी, माधुरी, काजोल अगदी आता आता पर्यंतच्या अनुष्का, सोनमला यशराज आणि धर्मा प्रोडक्शनस् नी ह्या युरोपियन स्प्रिंग मधे रोमॅन्टिक अवतारात दाखवलं..अमिताभ शाहरुख, ऋषी कपूर इत्यादी नायकांमधली सौंदर्या दृष्टी आपल्या कॅमेरात अचूक टिपलं. आणि आपल्यातल्या दिग्दर्शकाला नेमकं काय हवय हे जाणणाऱ्या करता ही संधीच नाही का??

सिलसिला, चांदनी, दिल तो पागल है सारख्या रोमॅन्टिक सिनेमांना ह्या वसंतानी खऱ्या अर्थानी खुलवलं.

देखा एक ख्वाब तो यह सिलसिले हुऐ<br>
दूर तक निगाहों में हे गुल खिले हुऐ....

किंवा..

सुनो सजना पपीहेने कहां सबसें पुकार के<br>
संभल जाओ चमन वाला के आए दिन बहार के..

आजा आयी बहार दिल है बेकरार..<br>
हे तर काश्मीर मधे चित्रीत झालेलं गाणं..

किंवा अगदी अलीकडेचं

कैसी है ये रुत की जिसमें फुल बनके दिल खिले..

जसं मघा मी म्हणाले की एखाद्या कवी करता वसंत म्हणजे स्वतःला ह्या रंगांमधे पूर्णपणे रंगवून आपल्या शब्दांमधे त्याला उतरवण्याची संधीच जणू... त्यामुळेच आता अस्मादिकांना सुचलेली एक वसंतावरची कविता...

आता फुलायचे तुला आता नाहीच उसंत<br>
कसा वेड लावियतो माझा वसंत वसंत

कुठे नांदत होतीस कळी बनून कुशीत<br>
तुझी वाट पाहतो गं माझा वसंत वसंत

तुझ्या नाजूक देहाला तो ही घेईल मिठीत

जपे पाकळी पाकळी माझा वसंत वसंत

तुझ्या हरेक रंगाला साठवतो तो मनात
तुझ्या रंगावीन नाही माझा वसंत वसंत

आता कळले जगाला तुझे सुंदर गुपित
तुझ्या मनात नांदतो माझा वसंत वसंत

आता नको लावू वेळ ये ना नाचत डुलत
आहे आतूर कधीचा माझा वसंत वसंत...

तुझ्या एका हाके साठी येतो गंध उधळत
तुझ्या मुळेच फुलतो माझा वसंत वसंत...

# मनातले सूर आणि ...!

भार्गवी बाबरेकर

सार्‍या आसमंतात अरुणोदयाची सुंदर छटा पसरली होती. पहाटेच्या गार वार्‍यामध्ये सूर्याच्या येण्यामुळे थोडी ऊब जाणवत होती. हळूच कुठून तरी मोगऱ्याचा गंध येत होता... गुलाबही हलकेच उमलत होते. कमळाच्या फुलांपाशी भ्रमर गुंजारव करत होते...आणि पक्षी सुद्धा गोड स्वरात किलबिल करत होते.

अश्या रम्य सकाळी, ती वसंतसेना हिरव्या गार झाडा खाली कसलासा विचार करत झोपाळ्यावर बसली होती... तिची मुद्रा प्रसन्न होती. तिच्या सभोवती घडत असणाऱ्या घटना ती मनसोक्त आनंद घेत बघत होती. तेवढ्यात तिच्या कानावर अलगद बसंत रागाचे सूर आले.. ते सूर ऐकून ती बेचैन झाली. "हा मध्यरात्रीचा राग पहाटे कोण गात आहे?" असा प्रश्न तिच्या मनात उद्भवला आणि त्या आवाजाच्या दिशेने ती चालू लागली. आसपासचा सगळा परिसर तिने बघितला पण कोणीही तिच्या नजरेस पडलं नाही!

शेवटी ती पुन्हा त्या झाडा खाली येऊन बसली. तिच्या मनात मात्र तेच सूर गुंजत होते. काय जादू होती त्या आवाजात! कोण असेल तो गाणारा? कसा असेल तो? कुठून आला असेल? कसा दिसत असेल? असे असंख्य प्रश्न तिच्या मनात येत होते!

"हा असा आवाज या आधी तर कधी ऐकला नाही!.... हो! बरोबर आहे; या आधी कधी मी अशी निवांत या माझ्या बागेत आले सुद्धा नव्हते! आज पहिल्यांदा बघतेय हे सगळं मी! कित्ती सुंदर आहे ही सकाळ! हे सौंदर्य फक्त सकाळीच असतं ना...संध्याकाळी या बागेचं रूप काही तरी वेगळं असतं! ते सुद्धा छानच असतं पण ही पहाट काही वेगळीच आहे! ....."

तिची खात्री पटली; आयुष्याची संध्याछाया विरत आली की रात्र होते. पण पहाट जरी संपली तरी संध्याकाळ व्हायला थोडा अवकाश असतो!

हा सगळा विचार करता- करता सूर्याचा प्रकोप कधी वाढला ते तिला कळलेच नाही. अचानक उन्हाचा चटका तिला लागला. ती भानावर आली आणि चटकन उठून घरात गेली. दिवस भर तिचा एकच विचार चालू होता. तो आवाज आणि ते सूर...!

याच विचारात सकाळची संध्याकाळ झाली आणि तिला बागेची आठवण झाली. वसंतसेना पुन्हा त्याच झाडाखाली येऊन बसली. पुन्हा तोच फुलांचा दरवळ... तीच पक्ष्यांची किलबिल आणि तेच निरभ्र आकाश तिला दिसलं! पण त्यात फरक होता! पहाटे आकाशात नवचैतन्य होतं आणि आता मात्र परतीचे रंग! पक्षी तसेच किलबिलाट करत होते पण त्यांच्या आवाजात थोडासा थकवा जाणवत होता.. फुलं सुंदर फुलली होती पण

पाकळ्यांची किनार थोडी सुकलेली वाटत होती! मोगऱ्याची काही फुलं पापण्या मिटल्यावर डोळ्यातून अश्रू ओघळावे तसे झाडावरून खालच्या गवतावर अलवार पणे ओघळून पडत होती. सुगंध आणि बकुळाचा थोडा उग्र पण मोहक गंध होता! तिने त्या वाऱ्याला कवटाळून घेतलं ... त्या वाऱ्यासोबत तेच पहाटेचे बसंताचे सूर तिच्या कानावर पडले! ती पुन्हा त्या सुरांच्या दिशेने पावलं टाकू लागली...! पण तिला पुन्हा एकदा कोणीच दिसलं नाही!

आता मात्र तिची अस्वस्थता वाढली! हा आवाज कोणाचा... हे सूर कोणाचे? हे प्रश्न तिला अधिकच त्रास देऊ लागले. उजेडाचं राज्य लयाला जात होतं..आणि थोडासा अंधार होऊ लागला होता! इतक्यातच तिला ते सूर तिच्या जवळ येत आहेत की काय असं वाटू लागलं. तिची अधीरता वाढली! ती एकेक पाऊल पुढे टाकत होती आणि त्या आवाजाला जवळ करत होती. आता मात्र तिचा धीर सुटला आणि तिने आवाज दिला...

"को.. कोण आहे? कोणाचे सूर इथे पहाटे पासून गुंजत आहेत? माझ्या समोर या! कोण आहे तिकडे?"

तोच एक वेगळाच सुगंध सर्वत्र पसरला...! पानांची सळसळ ऐकू येऊ लागली आणि वसंतसेनेच्या कानात शब्द ऐकू आले!

"मी वसंत!....तुझ्या माझ्या सगळ्यांच्याच मनातला..!"

वसंतसेनेला सारं काही क्षणार्धात कळलं आणि तिच्या मनातल्या वसंताच्या सुरांच्या प्रेमात ती 'पुन्हा' एकदा पडली...!

# राम

निर्मिती देवलसी

वाल्मिकी रामायणाचा राम हा सर्वतोपरी आदर्श आहे. मनुष्याने जास्तीत जास्त किती चांगले वागावे याची सीमा दाखविणारा  तो मर्यादा पुरुषोत्तम आहे. रावणवधानंतर जेव्हा, ' तू भगवान आहेस :असे म्हणून रामाची स्तुती केली जाते, त्या वेळी राम नकार देतो आणि म्हणतो 'मी मनुष्य आहे '

' आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम् ।'

राम आदर्श पुत्र आहे. आदर्श बंधू आहे, आदर्श पती आहे. आदर्श पिता आहे, आदर्श मित्र आहे, इतकेच काय तो आदर्श शत्रू देखील आहे. मनुष्य आपल्या कर्तृत्वाने देव कसा होऊ शकतो याचे सर्वोकृष्ट उदाहरण म्हणजे 'राम.' म्हणूनच असे सार्थत्वाने म्हणता येईल राम प्रथम राम आहे आणि नंतर प्रभू आहे.

राम हा सकलगुणमंडित आहे. तो प्रजेला आल्हाद देणारा, क्षमवान, वैर्यवान, बुद्धिमान, प्रजेचा जणु काही बहिश्चर प्राण आहे. असं म्हणतात -

**आत्मा म्हणजे केवळ 'राम' , मन म्हणजे निर्मळ सीता आणि जागरुकता हा तर लक्ष्मण. अवघ्या शरीरी अपुल्या रामायण आहे. राम हा अवघ्या चरांचरांत आहे.**

कवि कुसुमाग्रज म्हणतात -

" शरयूतीरी नगर अयोध्या दशरथ राजा राज्यकरी ।
पुत्र थोरला राम तयाचा जो चंद्रापरि ताप हरी ।।"

'राम नाम' हे मनाच्या गाभा-याला आनंद देऊन जातो. संस्कृत साहित्यात काव्याच्या प्रयोजनात एक उक्ती आली आहे . ज्यात म्हटले आहे-

"रामादिववर्तितव्यं न रावणादिवत् ।"

रामाप्रमाणे आपले आचार-विचार असावे , रावणाप्रमाणे नाही. दुर्जनांचा नाश करून कुशल प्रशासनाचा आदर्श प्रस्थापित करणारे म्हणजे मर्यादापुरुषोत्तम 'प्रभू श्रीराम' . 'राम' हा सर्वोतोपरि आहे. माता-पित्यांचा आदर करावा , त्यांचा शब्द कसा पाळावा हे रामाकडून शिकावे. एक वचनी, एक बाणी असे हे रघुनंदन.

असं म्हणतात - प्रभू रामाला जीवनाचे सत्य माना , मार्गक्रमण करत राहा , यश तुम्हाला नक्कीच मिळेल .
अश्या प्रभू श्रीरामास -

रामो राजमणि: सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नम: ।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम् ।
रामे चित्तलय: सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥

# हृदय मंदिरातील राम

अंजली मनीष उपाध्ये

"राम" या दोन शब्दात भवसागर पार करण्याचं सामर्थ्य आहे .

"रामनाम" म्हणजे शारीरिक व मानसिक आरोग्य निरामय राखण्याची गुरुकिल्ली आहे.

"राम "या शब्दातील "र " अक्षरात शक्ती,बुद्धी ,गती आणि अग्नी तत्व समाविष्ट आहे .त्यामुळे " रा " वर अनुस्वार देऊन " रां " म्हणताना ही सारी तत्व आपल्यात समाविष्ट होतात व ऊर्जा निर्माण होऊन कार्य सिद्धि होऊ शकते. राम म्हणजे चैतन्य ,राम म्हणजे आनंद . राम साक्षात परब्रम्ह आहेत. सच्चिदानंद शाष्वत स्वरूप आहेत. भक्त वत्सल आहेत. श्रेष्ठ शील , कोमल वाणी असलेले कृपा निधान आहेत.

महर्षी अत्रींनी म्हटलेले आहे -

नमामि भक्त वत्सलं

कृपालु शील कोमलम

जगद् गुरुंच शाशवतं

तुरीयमेव केवलम

अशा या श्रीरामाला शत-शत नमन असो.

रामाचे प्रभू अवतार कार्य फक्त दुष्टांच्या संहारा पुरते मर्यादित नसून सद धर्माची प्रतिष्ठापना करणे ,सामान्य मानवजातीला सन्मार्ग दाखवून जीवन मूल्यांचा आदर्श घालून देणे, या साठी उद्युक्त आहे.

समर्थ रामदास स्वामींनी प्रभू रामचंद्रांना देवांचाही देव म्हटलेले आहे .राम म्हणजे भक्ती आणि शक्तीचा समन्वय आहे .गोस्वामी तुलसीदास यांची तर आस, ध्यास आणि विश्वास सगळं काही राममय आहे. उत्तर भारतातील घराघरात सामान्य जनतेच्या हृदय सिंहासनावर प्रभुराम चंद्राची स्थापना करण्यात गोस्वामी तुलसीदास यांचा सिंहाचा वाटा आहे. संत कबीरांनी रामाची दोन रूपे मांडली आहेत . सगुण साकार व निर्गुण निराकार.

पण कबीरांना निर्गुण रूप जास्त मोहवणारे आहे .ते आपल्या एका दोह्यात म्हणतात, पढने की हद समझ है ,

समझने की हद है ज्ञान<br>
ज्ञान की हद राम है<br>
यह सिद्धांत कहू राम ॥

विश्वरूपी घराचे देवघर म्हणजे आपला भारत देश .या देवघरात सगुण अवतारी पुरुष प्रभुराम चंद्राचे त्रिकालाबाधित वास्तव्य आहे .प्रभू रामचंद्र हे भारत वर्षाचा आत्मा आहे .महाप्राण आहेत. आदि कवि वाल्मीकिंनी रामायण या काव्यातून रामरायाचे अलौकिक सामर्थ्य ,चरित्र पुढील पिढीला प्रेरणा स्वरूप म्हणून कथित केलेले आहे .त्यात सद्गुणांचा परोत्कर्ष आहे. रामरायांनी मानवी अवतार नुसता धारण न करता आचरणात आणून एक अद्वितीय युग प्रवर्तक असे चरित्र समाजापुढे सिद्ध केले आहे. सर्व मानवी जीवनामध्ये "श्रीराम " ओतप्रोत भरलेले आहेत .त्यांच्या चरित्राला जगात तोड नाही.

रोज सकाळी उठल्यापासून ते अखेरच्या श्वासापर्यंत "राम नामाने "आपले जीवन व्यापून टाकले आहे .

आपण जेव्हा एकमेकांना प्रथम भेटतो तेव्हा राम राम.... म्हणतो .

जीवन निरर्थक वाटायला लागते तेव्हा आपण म्हणतो, जगण्यात" राम " उरला नाही.

शेवटच्या क्षणी सुद्धा रामाचे नाव यावे हीच अपेक्षा असते.

श्वास संपल्यावर सुद्धा रामनामचं तारते ही आपली दृढ श्रद्धा आहेच. असे हे "रामनाम" आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे .

सर्व श्रेष्ठ कवी बिपीनचंद्र सरस्वती नी रामरायाची चतुर्विध रूपे सांगितली आहेत. ते म्हणतात,

एक राम दशरथ का बेटा ,<br>
एक राम घट घट में लेटा,<br>
एक राम का सकल पसारा ,<br>
एक राम है सबसे न्यारा ॥

प्रभू रामचंद्र म्हणजे निर्गुण, निराकार ,मर्यादा पुरूषोत्तम, एकबाणी,एक पत्नी सदाचरणी,तेजस्वी ,तपस्वी , नीतीसंपन्न अशा गुणांची खाण स्वरुप आहेत.

अशा या गुणातीत ,निरंजन ,निराकार ,परब्रम्ह, सत्यस्वरूप प्रभू रामचंद्रांना आपल्या हृदयात साठवायचे असेल तर "श्रीराम जयराम जयजय राम " या तेरा अक्षरी बीज मंत्राने ते साध्य करता येईल. "श्रीराम" या पहिल्या शब्दाने राम रायाला आवाहन करायचे "जयराम" म्हणून त्यांचा जयजयकार करायचा ,स्तुती करायची व

"जयजय राम " च्या जयकाराने त्यांना समर्पित होऊनशरण जायचे, त्यांच्या चरणाशी लीन व्हायचे. त्यानंतरची जी कृपानुभूती येईल ती धन्य धन्य करून सोडेल ."श्रीराम" या एका शब्दात विष्णूसहस्त्र नाम जपल्याचे अद्वितीय सामर्थ्य आहे . रामाचे भजन, तेची माझे ध्यान.

राम नामाचे ,राम चरित्राचे, प्रभुरामांचे आपल्या हृदयातील स्थान अढळ आहे .

ज्याचे मुखी राम नाम ,
तो नर धन्य तिन्ही धाम

# पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा

प्राजक्ता बर्वे

मी कुणी फार मोठी संत, तत्वज्ञ नाही, पण तरी सुध्दा रोजच्या जीवनात घडणाऱ्या घटनांमधून काही गोष्टी मी निरीक्षणाच्या माध्यमातून टिपून घेते त्यावर लिखाण करण्याचा हा माझा प्रयत्न.

जगी सर्व सुखी असा कोण आहे?

विचारी मना तूची शोधून पाहे...

असं समर्थ रामदास म्हणतात.

आणि यात चूक असं काहीच नाही. प्रत्येक माणसाच्या जीवनात दुख हे असतंच, किंबहूना आपल्या आयुष्याच्या अविभाज्य भागात जसं सुख असतं, तसंच दुःख सुध्दा असतं.

सुखास्य नंतरं दुःखं, दुःखास्य नंतरं सुखं... हे चक्र आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत चालूच असतं.

आता ही सुख दुःखाची टेप मी का वाजवतेय याचं कारण सुध्दा देते. कसंय ना दुख सगळ्यांच्याच आयुष्यात असली तरी सगळेच जणं दुःखी नसतात. दुःख हे ज्याच्या त्याच्या मानण्यावर असतं.

तसं तर प्रभू श्रीरामांना सुध्दा वनवास चुकला नाही, दुःख, कष्ट, हाल, अपेष्टा, हे सगळं काही त्यांना सुध्दा भोगावं लागलं...

हा प्रश्न खरं तर मला सारखा सतावतो की का बरं वाल्मिकींनी श्रीरामांच्या पदरी हे दुख दिलं? म्हणजे खरं तर ते विष्णू चा अवतार होते, मग भगवंताला कसलं दुःख? पण मग जरा वाचन केल्यावर माझ्या असं लक्षात आलं की दुःखाला, आलेल्या कठीण परिस्थितीला कसं सामोरी जावं हे समाजाला शिकवण्यासाठी म्हणून वाल्मिकींनी हे केलं असणार.

भरत जेव्हा रामाला भेटायला वनात जातो तेव्हा तो स्वतः सुध्दा प्रचंड दुःखी असतो. जीवापाड प्रेम करणाऱ्या बंधूला १४ वर्ष वनात रहावं लागणार आणि ते ही आपल्या आई मुळे... हे फक्त दुःख नसून यात त्याच्या मनाला

अपराधीपणाची भावना सुद्धा आली.. अशा सगळ्या परिस्थितीत राम भरताला समजावतात, भरताला परिस्थिती आहे तशी स्वीकारायला सांगतात.

कोणत्याही आपदे कडे बघण्याचे दोन दृष्टिकोन असतात.

एक म्हणजे: काय हे?मीच का बरं यात अडकलो/अडकले, आधीच काय मेली संकटं कमी आहेत की यात अजून एक भर??? आणि दुसरा म्हणजे: ठीक आहे! आता हे संकट आलंय... मला यात फार काळ अडकायचं नाहीये. यातून मार्ग कसा काढायचा यावर आपण लक्ष द्यायला हवं.

# ऋतुराज वसंत

दिशा टिकेकर

आला वसंत ऋतू आला
वसुंधरेला हसवायाला
सजवीत, नटवीत लावंण्याला
आला वसंत ऋतू आला

हिवाळ्यातील थंडीचा अनुभव घेऊन नंतर त्याच थंडीला कंटाळून आपण सगळेच आतुरतेने वाट बघतो ती वसंत ऋतूची. या ऋतूत निसर्गातील अनेक गोष्टी आपले मन वेधून घेतात. वसंत ऋतू विविध फुलांच्या रंगाची उधळण करत असतो. झाडांचे, वेलींचे कष्टाचे दिवस संपून पालवी फुलली आहे. लहान लहान कळ्या झाडांवर, वेलींवर जन्मास येऊ लागल्या आहेत. लाल - केशरी रंगांनी गुलमोहर बहरला आहे. तर मोगऱ्याची कळी हळूच हसते आहे आणि तिच्या सुगंधाने संपूर्ण वातावरण मोहरले आहे.

" वृक्ष, लतांचे देह बहरले।फुलाफुलातून अमृत भरले।
वनावनातून गाऊ लागल्या पंचमात कोकीळा
आला वसंत ऋतू आला॥"

आंब्याला मोहोर आलेला आहे आणि त्या मोहोराचा सुगंध सर्वत्र दरवळतो आहे. काही झाडांना तर लहान लहान कैऱ्या सुद्धा आलेल्या आहेत. वृक्षावर पक्ष्यांची किलबिल जरा वाढली आहे. तर कोकीळेचे मंजूळ स्वर सर्वत्र ऐकू येत आहे आणि अशा या मनोहर वातावरणात सुर्य देवता देखील आपली उपस्थिती वारंवार दर्शवित आहे.

वसंत ऋतू हा सगळ्या ऋतूमध्ये श्रेष्ठ मानला जातो. या बहारदार ऋतूला "ऋतुराज" असेही म्हणतात. शेतकऱ्यांसाठी पण वसंत ऋतू फार महत्त्वाचा आहे. शेतामध्ये गव्हाचे पीक डोलू लागले आहे. काही गावांमध्ये तर वसंत ऋतुच्या आगमनामुळे उत्सव सुद्धा साजरा होतोय. . रामनवमी, हनुमान जन्मोत्सव, वसंत पंचमी

असे सण वसंत ऋतुचा गोडवा अजून वाढवतात.

वसंत ऋतुत पानगळ सरून झाडांना छान अशी पालवी आलेली आहे. फुलांमध्ये, झाडांमध्ये नवीन उत्साह बघायला मिळतो आहे. वातावरण अगदी सुखद भासते आहे. निसर्ग हिरवागार होऊन पक्ष्यांचे मधुर आवाज कानावर पडत आहे. शाळांमध्ये परीक्षेंचे दिवसही सुरू झाले आहेत. कुसुमाग्रज म्हणतात,

" वसंत ऋतु हा सौंदर्य, प्रगती आणि नवीन वय यांचे दुसरे नाव आहे"

वसंत ऋतुत कवींना, लेखकांना आणि साहित्यिकांना लेखन करण्यासाठी, कविता लिहिण्यासाठी नवनवीन कल्पना सुचतात. कालिदासांनी असे लिहिले आहे की, "ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर आणि वसंत या ऋतूंमध्ये आपली वसुंधरा विविध रंग आणि रूप धारण करते. मात्र या सर्व ऋतुंमध्ये श्रेष्ठ रंग आणि रूप असते ते वसंत ऋतूचे.

व्याकुळ विरही युवयुवतींना
मधुर काल हा प्रेममिलना
मदनसखा हा शिकवी रसिका श्रृंगाराचा कला
आला वसंत ऋतू आला
आला वसंत ऋतू आला

# ।।एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम्।।

सायली अक्षय देशपांडे

संध्याकाळ झाली दिवेलागणीची वेळ झाली की स्वच्छ हातपाय धुवायचे, देवाजवळ दिवा लावला की अंगणात असलेल्या तुळशीजवळ दिवा लावायचा,डोळे मिटून मनातल्या सगळ्या विचारांना दूरवर सोडून फक्त अनन्यभावाने शुभंकरोति म्हणायचं आणि त्यापाठोपाठ गणपतीस्तोत्र,मारुतीस्तोत्र, श्रीरामरक्षास्तोत्र म्हणायचं असा परिपाठ आजी आजोबांनी लहानपणी जो घालून दिला होता तो आजही तसाच सुरू आहे.

कुठलंही स्तोत्र म्हणत असतांना त्याचं मर्म सांगणारं असं काहीतरी त्या स्तोत्रात असतंच तसंच जेव्हा जेव्हा मी रामरक्षा म्हणायची त्यावेळी संस्कृत भाषेचं इतकं ज्ञान नव्हतं. पण त्यातलं संस्कृत हे अगदी कोणालाही समजेल इतकं सोपं आणि सहज आहे. आपण जे काही म्हणतो त्याचा अर्थ आपल्याला सांगता यायला हवा. असं आबा नेहमी सांगायचे आणि आजही सांगतात. याच एका न्यायाने मी जेव्हा जेव्हा रामरक्षा म्हणते तेव्हा मला गेले कित्येक वर्ष "एकैकमक्षरं पुंसामहापातकनाशनम्" ही एकच ओळ मला खूप अंतर्मुख करायची अजूनही करते. शब्दशः अर्थ अगदी सोपा आहे पण तो खूप खोल विचार करायला भाग पाडतो.

प्रत्येक व्यक्तीचा हा स्वभाव असतो की मी कितीही पापं केली तरी त्याचं क्षालन करायला मिळतंय ना मग झालं. या अनुषंगाने सुद्धा बरेच जणं वरच्या एका ओळीवर प्रेम करतांना दिसतात. दिवसभर अद्वातद्वा बोलायचं आणि संध्याकाळी मात्र संपूर्ण रामरक्षेतली ही एक ओळ म्हंटली की पापांचं क्षालन झालं असा समज आजही हे स्तोत्र न समजून म्हणणाऱ्यांमध्ये आहे. ही ओळ म्हणजे या स्तोत्रातली एक महत्वाची मेख आहे असं मला कायम वाटतं. प्रभू श्रीरामाचे चरित्र हे गोड आहे आणि शतकोटिप्रविस्तरम् एवढं मोठं आहे. याला पुष्टी म्हणून गोस्वामीजी म्हणतात "रामायण शतकोटि अपारा".

आपल्या सुदैवाने आणि भाग्याने आपल्याला पुण्याचा साठा या भारतात मिळाला तो स्तोत्रमंत्रांच्या रुपात. हे सगळे नुसते शब्द नसून त्यात असलेल्या अर्थात सुद्धा तितकीच शक्ती आहे तितके ते सगळे शब्द सिद्ध आहेत. बरेचदा आपण ऐकतो की पुराणांमध्ये एखादा मंत्र सिद्ध करावा लागला. पण हे स्तोत्र म्हणजे स्वयंसिद्ध आहेत.

असं एकही स्तोत्र नाही असा एकही मंत्र नाही जो सिद्ध नाही. त्याचं योग्य पठण झालं तर त्याचे लाभार्थी आपणच असणार आहोत हे किती आनंददायी आहे.

चैत्र महिना आला रामाचं नवरात्र असलं की जागोजागी रामरक्षा पठणाला उधाण येतं. सगळी नामसंकीर्तन सुरू असतं. पण एका दिवशीच्या अवसानाला उपासना कशी म्हणायची? नियमाने आणि नेमाने जी केली जाते ती उपासना. याचं गांभीर्य आपण आता तरी जाणयला हवं. माझ्या पापांचं क्षालन होणार आहे म्हणून मी हे स्तोत्र म्हणेल अशी भावना असेल तर आपण हे लक्षात ठेवायला हवं की गंगेचं सुद्धा शुद्धीकरण झालं. आपल्या पापामुळे त्या स्तोत्राला मलिनत्व येऊ नये याची काळजी आपण घ्यायला हवी. मुळात आपण इतके यतकश्चित आहोत की आपल्यामुळे ते स्तोत्र मलिन होईल हे शक्य नाही. पण तरीही ते सिद्ध असावं याची काळजी आणि जण आपण नक्कीच ठेवू शकतो.

प्रभू श्रीरामाच्या कथेला नुसतं कथासार म्हंटलं नाही तर ते "कथामृत" आहे. भगवंताने भगवद्गीतेत अर्जुनाला आणि अर्जुनाच्या निमित्ताने आपल्या सगळ्यांना असे आश्वासन दिले आहे की,अर्जुना,दुराचाराचा त्याग करूनज्याने माझे भजन सुरू केले,त्याच्या जीवनामध्ये आधी वाटेल तितका दुराचार घडलेला असला तरी पण त्याचा उद्धार करण्यासाठी मी बांधलेलो आहे. भगवंत आश्वासन देतात की,

" अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:"

अर्थातच  तुझ्याकडून कितीही पातक घडलेलं असलं तरीसुद्धा त्या संपूर्ण पातकांचा नाश करून तुला मी क्षमा करील पण त्यासाठी तुला भजन करायला हवे.

इतकं अभय असतांना आणि काय हवं हो? भगवंत सुद्धा आपल्याला सत्कर्मासाठी प्रोत्साहित करत असताना सतत आपल्याला कर्तव्याची जाणीव करून देत असतो. तेव्हा ही रामनामाची कथागंगा घरोघरी कशी वाहती ठेवता येईल यासाठी आपण प्रयास कृतीच्या आधाराने करायला हवा. हा संकल्प नववर्षाच्या निमित्ताने करूया आणि आपले संस्कार जपूया. जय श्रीराम..!

# समारोप

“ती” चं पान. जे फक्त तिचं असेल तिच्या हक्काचं असेल. तिच्या भावनेला शब्दबद्ध करण्याचं एक माध्यम. या माझ्या संकल्पनेला सगळ्यांनी आनंदाने होकार दिला आणि कुठल्याही चांगल्या हेतूने सुरुवात केलेलं कार्य हे सिद्धीस जातं याचं प्रमाण म्हणजे हे आगळंवेगळं मासिक असंच मी म्हणील..यात ज्यांनी ज्यांनी लेख लिहिले कविता लिहिल्या या सगळ्या सख्यांचं वाचन आणि लेखन संस्कृतीवर असलेलं प्रेम असंच राहावं अशी इच्छा व्यक्त करते. आपण हा छोटासा प्रयत्न गोड मानुन घ्याल या अपेक्षेसह माझ्या लेखणीला विराम देते.

धन्यवाद ...!

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह...!

आमचे आधीचे अंक वाचण्यासाठी आमची वेबसाईट www.tichapaan.com ला भेट द्या.

- आपण आपला अभिप्राय आम्हाला आमच्या व्हॉट्सअॅप क्रमांक 7378499977 वर कळवू शकता. आम्ही नक्कीच तो आमच्या लेखिकांपर्यंत पोहचवू.
- आमच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमच्या वेबसाईटवर फॉर्म उपलब्ध आहे. जर आपणास वेबसाईटवर फॉर्म भरणे शक्य होत नसेल तर आम्हाला आमच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर मेसेज करा आम्ही नक्कीच आपणास सहकार्य करू...